# विश्वकर्मा विद्यापीठाला डायमंड रेटिंग

**पुणे, ता. ११ :** देशातील 'क्यूएस आय-गेज' या उच्चशिक्षण क्षेत्रातील जागतिक स्तरावर मान्यताप्राप्त क्रमवारी संस्थेकडून विश्वकर्मा विद्यापीठाला प्रतिष्ठेचे 'डायमंड रेटिंग' प्रदान करण्यात आले. विद्यापीठाच्या गुणवत्तापूर्ण शिक्षण, संशोधन आणि विद्यार्थी विकासासाठीच्या कटिबद्धतेसाठी हे 'रेटिंग' देण्यात आले असून, ते २०२७ पर्यंत कायम राहणार आहे.

'क्यूएस आय-गेज' ही भारतातील महाविद्यालये आणि विद्यापीठांचे स्वायत्त मूल्यमापन व क्रमवारी करणारी विश्वसनीय संस्था आहे. विविधता, प्रवेशयोग्यता, सामाजिक जबाबदारी आणि रोजगार क्षमतेसाठीच्या संधी अशा विविध निकषांवर या संस्थेतर्फे विद्यापीठांचे मूल्यमापन केले जाते. विश्वकर्मा विद्यापीठाने यातील अनेक विभागांमध्ये उत्कृष्ट कामगिरी केली असून, शिक्षण व अध्यापन, सुविधा आणि शैक्षणिक विकास यामध्ये 'प्लॅटिनम रेटिंग' तसेच रोजगारक्षमता आणि सामाजिक जबाबदारी यामध्ये 'डायमंड रेटिंग' विद्यापीठाला प्राप्त झाले आहे.




**पुणे :** 'क्यूएस आय-गेज' या संस्थेकडून 'डायमंड रेटिंग' स्वीकारताना (डावीकडून) डॉ. सिद्धार्थ जबडे, भरत अगरवाल, रविन नायर आणि डॉ. डब्ल्यू. एन. गाडे.

विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. सिद्धार्थ जबडे म्हणाले, ''प्रतिष्ठित 'क्यूएस आय-गेज' संस्थेकडून मिळालेल्या 'डायमंड रेटिंग'मुळे विद्यापीठाच्या गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठीच्या प्रयत्नांना मान्यता मिळाली आहे. आमच्या सहभागी आणि सर्वसमावेशक विकास प्रारूपामुळे आम्हाला हे यश मिळाले आहे.''

विद्यापीठाचे अध्यक्ष भरत अगरवाल म्हणाले, ''विद्यापीठाने रोजगार क्षमतेवर भर देणाऱ्या प्रकल्पाधारित शिक्षणसंस्कृतीचा विकास केला आहे. सर्वसमावेशकता आणि नावीन्यतेला प्राधान्य दिले आहे. या यशामुळे आमच्या उच्च शिक्षणाचे भविष्य घडवण्याच्या अभियानाला बळकटी मिळाली आहे. 'डायमंड रेटिंग' प्राप्त झालेल्या भारतातील ४१ विद्यापीठांमध्ये आमच्या विद्यापीठाचा समावेश झाल्याचा मला अभिमान वाटतो.''